जा.क्र / PTA/2930 /2025.
धर्मादाय आयुक्त भवन,
2 रा मजला, सास्मिरा इमारतं, सास्मिरा रोड,
वरळी, मुंबई 400 030
दिनांक 16 JUN 2025

पहा :- मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भ/ वेतन शाखा / 6049/23 दिनांक 22.11.2023 रोजीचे पत्र

## परिपत्रक क्रमांक 618 दिनांक 16/ 06/ 2025.

सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या बँक खात्यातील शिल्लक रक्कम प्रत्येक महिनाअखेर रुपये 3000/- शिल्लक ठेवून उर्वरीत सर्व रक्कम मुख्यालयाच्या सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या बँक खात्यामध्ये **NEFT/RTGS** ने जमा करावी व जमा खर्चाचे अहवाल दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत मुख्यालयाला कळवावे, असे आदेश देण्यात आलेले आहेत.

परंतु असे निदर्शनास आलेले आहे की, सदर आदेशाचे पालन अधिनस्त कार्यालयांकडुन होत नाही. अधिनस्त कार्यालयांनी त्यांच्याकडील सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या बँक खात्यातील रकमा मुख्यालयाकडे वेळोवेळी जमा न केल्यामुळे सदर रकमा अधिनस्त कार्यालयांच्या खाती विनाकारण पडून राहतात. सदर रकमेवर बँकेकडून व्याज मिळत नसल्यामुळे कार्यालयाचे आर्थिक नुकसान होते. मा. महालेखापाल कार्यालयाने याबाबत लेखा आक्षेप नोंदविलेले आहेत.

तसेच बऱ्याच वेळा अनेक कारणांसाठी अधिनस्त कार्यालयांना सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या बँक खात्यामधून रकमा वर्ग कराव्या लागतात. मुख्यालयाला अधिनस्त कार्यालयांकडून वेळोवेळी रकमा प्राप्त न झाल्यामुळे मुदतठेवींचे रोखीकरण करुन अधिनस्त कार्यालयांना रकमा वर्ग कराव्या लागतात.

सदर परित्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, प्रत्येक महिनाअखेर रुपये 3000/- शिल्लक ठेवून उर्वरीत सर्व रक्कम मुख्यालयाच्या सार्वजनिक न्यास प्रशासन निधीच्या बँक खात्यामध्ये **NEFT/RTGS** ने जमा करावी व जमा खर्चाचे अहवाल दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत मुख्यालयाला कळवावे तसेच शासन मान्यतेशिवाय सार्वजनिक न्यास प्रशासन निधीमधून कोणताही खर्च करण्यात येऊ नये. सदर परिपत्राकाद्वारे काटेकोरपणे पालन करावे.

16/06/25

( अमोघ श्या. कलोती )
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

1. परिपत्रक धारणी, आस्थापना शाखा, मुख्यालय.
2. सर्व धर्मादाय सह आयुक्त,
3. सर्व धर्मादाय उप आयुक्त,
4. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,
5. सार्वजनिक न्यास प्रशासन निधी शाखा, मुख्यालय.
6. संगणक शाखा (संकेतस्थळावर प्रत उपपब्ध करुन द्यावी)